म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय बा. वा.
दा. क. ६२३६७
IRBK-0106237
IRBK-0106237



म. ग्रं. सं. ठाणे
विषय बालवाङ्मय
वा. नं. ६६०४

# पाडा

शं. रा. देवळे

। ज्ञान दीप लावू जगीं ।
चित्रशाळा प्रकाशन, पुणे.



# पांडा

नवसाक्षरांसाठीं

एका बैलाचें आत्मवृत्त

☆

शं. रा. देवळे

☆

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ६२३६
कि. ॥ ॥ नों दि.

त्रशाळा प्रकाशन पुणे २

किंमत आठ आणे

IRBK-0106237

मुद्रक व प्रकाशक
दामोदर त्र्यंबक जोशी,
बी. ए. (टिळक),
व्यवस्थापक, चित्रशाळा प्रेस,
१०२६ सदाशिव, पुणें २.

☆

सर्व हक्क स्वाधीन

☆


प्रथमावृत्ति १९५७

* * * *

## श्री. शं. रा. देवळे यांचीं पुस्तकें :

चांदणी
सोनेरी भुंगा
कलिंग विजय
देवाची दिवाळी
आगरकरांची कथा
कमलची भाऊबीज
पंचतंत्र कथा
जुन्या जगांत
माझें पुरवणीवाचन
बडा नाना छोटा नाना
गरिबाची भेट
बाल गाणीं भाग १–२
वासंती आणि वाघोबा
बडा दादा
छोटा छब्या
भाग्यवान दौलती
चंदू आणि गोंदू
गारांचा पाऊस
नामदेवाची दिवाळी
पांडा
बंड्या
ऐतिहासिक कथा

* * * *



रामराम दादा—

माझं नांव पांडा. खरं म्हणजे नेहमीं मी तुमच्या जवळपास असतों. तुमचाच आहे मी. तुमचं जिणं आणि माझं जिणं अगदीं एकजीव झालेलं आहे. आपण दोघे मिळून 'काळ्या आई'ची सेवा करतों, खेळतों, बागडतों. तुमची माझी ओळख भारी जुनी – खूप खूप पिढ्यांची.

आतां तुम्ही लिहायला वाचायला शिकलांत; वाचलेल्या शब्दांचा अर्थ कळूं लागला आहे तुम्हांला, हें फार बरं झालं. अहो, मी तुमच्या जवळ असून सुद्धां मला माझं मन उघडून दाखवतां आलं नाहीं तुम्हांला; तें मन मी मोकळं करणार आहे.


तुम्ही माझ्या पाठीवरून प्रेमानं हात फिरवतां; अंगाप्रमाणंच माझं मनहि थरथरतं; बरं वाटतं. मी डोळ्यानं दाखवतों, तें तुम्हांला कळतं; तेंच मी आतां शब्दानं सांगतों.

माणुसकीसाठीं सारं जग धडपडत आहे आज. तुमच्या माणुसकीची गंगा माझ्यापर्यंत यायला पाहिजे; म्हणून तर मी तुमच्या वाटेवर येऊन बसलों आहे.

दुसऱ्याच्या मनांतलं दुःख कळलं कीं, आपली माणुसकी चटकन जागी होते. आपण दुसऱ्यावर मनापासून प्रेम करतों. मग तो माणूस असो, पशु असो, पक्षी असो, कोणीहि असो. असं तुमचं प्रेम मला आणि माझ्यासारख्यांना मिळावं एवढीच इच्छा!

तुमचा,


**पांडा**



# अनुक्रम


१. बाळपणींचा काळ सुखाचा - ५
२. आजीचें सांगणें - - ८
३. पावसानें डोळे वटारले - ११
४. चौघांच्या चार वाटा - १३
५. वैदीण बया - - १६
६. महाजनचा छकडा - - १९
७. सज्जन आणि दुर्जन - - २२
८. प्रदर्शनाला जातांना - - २५
९. प्रदर्शनाच्या आवारांतून घरीं - २७
१०. बैलपोळा - - ३०
११. खंडोबाची जत्रा - - ३४
१२. नाग डोह - - ३८
१३. भल्या आवशीं - - ४१
१४. चोरी अंगाशीं आली - - ४३



अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

# १. बाळपणींचा काळ सुखाचा

समोर नजर लावा जरा. डाव्या हाताला दिसते ती पुष्पावती नदी आणि उजव्या हाताला दिसते ती कुकडी नदी. या दोन नद्यांच्या मध्यें दिसतें तें हिवरें गांव. या हिवऱ्याला लालखानबुवांचें हिवरें म्हणतात. फार पूर्वी येथें लालखान नांवाचा फकीर होऊन गेला. त्यावरून या गांवाचें नांव लालखान हिवरें पडलें. या गांवांत तो पाहा उंचच उंच दिसतो ना, तो माझ्या धन्याचा वाडा. माझा जन्म त्या वाड्यांतच एका चौकांत झाला.

ही इथं जख्ख म्हातारी गाय दिसते ना, ती माझी आई. पंढरी हिचं नांव. कशी पांढरी फेक आहे. माझ्या थोरल्या भावाचं नांव बांडा, म्हणून मग माझं नांव ठेवलं पांडा.

मला पुरें आठवतें. मी झालों तेव्हां मला चाऱ्ही पायांवर उभें राहतां येत नव्हतें. माझ्या धन्यानें माझ्या पायाचे कोवळे खूर नखानेंच थोडें थोडें कुरतडून साफ केले, तेव्हां मला उभें राहतां येऊं लागलें.

पहिले चार पांच दिवस मला पाणी कसें प्यावें, दूध कसें प्यावें हें कळत नव्हतें. आजीनें म्हणजे माझ्या धन्याच्या आईनें माझी पहिल्या पांच सहा दिवसांत फार निगा राखली. धन्याचीं मुलें गंमत म्हणून पांडा पांडा करून माझ्या आंगाला व कपाळाला हात लावीत. आजी मुलांना म्हणे, "माझ्या पांडाला हात लावूं नका. चोळवटेल माझें वासरूं."

मुलें मला या पहिल्या चार पांच दिवसांत मळलेलें ओलें पीठ खाण्याचा आग्रह करीत. आजी मुलांना म्हणे, "मी घालतें तेवढेंच पीठ पुरेसें आहे, जास्त घालाल तर वासरूं आजारी पडेल."

माझ्या संगतीला गोठ्यांत आणखी वासरें होतीं. फक्त गोऱ्हे कोणकोणते होते त्यांचीं नांवें मी तुम्हांला सांगतों. लक्षा, पक्षा, सज्जन आणि महाजन असे माझ्या बरोबरीचेच चार गोऱ्हे गोठ्यांत होते. कालवडींचीं नांवें मला आठवत नाहींत.

लक्षा, पक्षा, सज्जन आणि महाजन यांच्यापेक्षां माझे लाड आजी फार करी. आजी म्हणे माझ्या गुणी गाईचं, पंढरीचं आहे हें छबडं. मला फार आवडतं. माझ्या पांढऱ्या फेक रंगावर आजी फार खूष होती. आजी माझे फार लाड करते, हें पाहून माझे सोबती लक्षा, पक्षा, सज्जन व महाजन म्हणत, "नशीबवान आहे बेटा."

हळू हळू ओलें गवत खाण्याची संवय आजीनें आम्हांला लावली. पितळींतलें पाणी प्यावयास आम्ही शिकलों. आईचे सड-



माझे खूर कुरतडून साफ केलें, तेव्हां मी उभा राहिलों.

सुद्धां मला चांगलें चोखतां येऊं लागले. आईला पितांना मी शेपटी वर करी आणि ढुसण्या देई. ढुसण्यामुळें तिला त्रास होई. तरी ती मला प्रेमानें पान्हा देई आणि चाटी. किती मायाळू माझी आई.

धनी दूध काढीत असतांना माझ्यासाठीं माझी आई पान्हा चोरून ठेवी. आजीला हें समजे. ती म्हणे "जाऊं दे दादा, पिऊं दे माझ्या पांडाला भरपूर दूध."

आम्हांला उद्योगधंदा कांहींच नव्हता. खायचें, प्यायचें, नाचायचें आणि बागडायचें. खरोखर—

"बाळपणींचा काळ सुखाचा अजुनि आठवतो घडी घडी!"

आणि त्यामुळें थोडा वेळ देहभान हारपून जातें. आमच्या उजव्या पायांत बांधलेले ते काळे गंडे आणि कवड्या, गळ्यांतल्या शिंपांच्या माळा, एखादें दुसरें घुंगरू. हें आठवलें कीं, अजूनहि नाचावें बागडावेंसें वाटतें.

हो, पण एक सांगायचें राहिलें. अगदीं जन्मल्याबरोबरची ती आठवण आहे. सकाळची वेळ होती. कोवळ्या उन्हांत मी बागडत होतों, इतक्यांत माझा धनी आला. मला वाटलें, माझ्या पाठीवरून तो हात फिरविण्यासाठीं आला.

इतक्यांत त्याच्या उजव्या हातांत कांहीं चमकलें. ती एक चकचकीत का[illegible]ी. त्यानें माझा कान घट्ट धरून ठेवला आणि कांहीं मुलें संक्रांत[illegible]ेळीं हलव्याच्या डब्यांच्या कानांना कात्री चालवून नक्षी करतात तसे त्यानें माझे कान कातरून नक्षीदार केले. मी हंबरलों, उड्या मारायचा प्रयत्न केला, माझे प्राण माझ्या डोळ्यांत गोळा झाले, पण धन्यानें तिकडे लक्षच दिलें नाहीं! पण हें चालायचेंच. पशु आणि पक्षी यांच्याशीं माणूस असाच वागतो. तो कुत्र्यांची शेपूट कापतो आणि पोपटाला पिंजऱ्यांत ठेवतो. असो. माझे कान कातरल्याबद्दल मला धन्याचा फार राग आला. तो राग आतां मी विसरलों, पण आठवण मात्र राहिली.

☆ ☆ ☆



## २. आजीचें सांगणें

आजी तिच्या मुलाला म्हणायची, "दादू, दुसरे कोणतेहि खोंड वीक, कालवडी वीक; पण माझा पांडा विकूं नकोस. माझी पंढरी कोणाला देऊन टाकूं नकोस. बांडाला दृष्टीआड करूं नकोस. हरणी तर दूर गेलेली मला सहन होणार नाहीं. कारण या साऱ्यांची आई पंढरी मोठी पायगुणाची आहे. तिच्यामुळें आपल्या घराला बरे दिवस आले. तिची खाण मोठी चांगली आहे म्हणून बांडा, पांडा व हरणी यांना जीव लाव."

माझा थोरला भाऊ शेतांत काम करायला लागला होता, पण माझी मात्र खूप चैन चालली होती. आम्ही वासरें मजेंत दिवस काढीत होतों. आमच्या धन्याच्या शेतांत ओल्या गवताला तोटा नव्हता. धन्यानें मोट धरली कीं, तिचें पाणी आम्ही पीत असूं. पेरलेल्या शेतांत उड्या मारल्या, तरी धनी माझें कौतुकच करी.

माझ्या बरोबरच माझ्या धन्याच्या नागर नांवाच्या म्हशीला टोणा झाला होता. तो बुधवारीं झाला होता म्हणून त्याला बुध्या म्हणत.

बुध्याची माझ्यासारखी निगा ठेवीत नसत. बुध्याचे लाडहि कोणी करीत नसे. म्हणून बुध्याची आई नागर म्हैस माझ्याकडे सदान्‌कदा मारक्या नजरेनें पाहात असे.


नागर म्हैस धन्याची लाडकी होती, पण तिचा टोणा कांहीं धन्याचा लाडका नव्हता म्हणून नागर तो राग माझ्यावर काढायला पाही. एकदां आम्ही शेतांत चरत होतों. धनी जवळच होता. माझ्या भोंवतीं चांगलीच हिरवळ होती. इतक्यांत नागर पुढें आली व

काय झालें हें कळण्यापूर्वींच तिनें मला हुंदडलें. पण माझ्या धन्याचें इकडे लक्ष होतेंच. तो धांवत आला आणि त्यानें नागरला चांगलेच तडाखे लगावले. तेव्हां ती मुकाट्यानें बांधाला चरूं लागली.

आमचा धनी नागर म्हशीला व आम्हां वासरांनाच फक्त शेतावर चरायला न्यायचा आणि माझी आई आणि इतर जनावरें यांना धन्याचा दहा वर्षांचा मुलगा नाथा डोंगर-किनारीला, माळ-रानावर चरावयाला घेऊन जायचा. खास धन्याच्या नजरेखालीं मी आणि माझ्याबरोबरीचीं वासरें होतीं. धनी दादू, दादूची म्हातारी आई, दादूची घरधनीन--रखमाबाई माझे फार लाड करीत.

दादूचा धाकटा मुलगा कृष्णा मला फार आवडे. कृष्णानें माझ्या पुढच्या उजव्या पायाला काळ्या गंड्यांत कवडी ओवून बांधली होती.

जे ते म्हणत, " वासरूं लै चांगलं आहे. " यामुळें मला दृष्ट लागेल आणि मी वाळून खराब होईन, असें आजीला वाटे. म्हणून आजीच्या सांगीवरून कृष्णानें माझ्या पायांत काळा गंडा बांधला.



मी शेतांत उभा होतों तोंच नागर म्हैस आली आणि—

कृष्णाला माझे दांत मोजण्याचा नादच होता. कृष्णा माझ्या वरच्या जबड्याला दांत उगवण्याची वाट पाही. आजीनें त्याला सांगितलें, "किसन, अरे बैलाला वरच्या दाभाडाला दांत नसतात." तरी आपला किसन माझे दांत पाहायचाच.


माझ्या जन्मापासून महिन्याच्या आंत खालच्या दाभाडाला पुढल्या बाजूला मला आठ दुधाचे दांत आले आणि बारा दाढा आल्या. हे दांत व दाढा आल्यानंतर मला किसन शेंगदाण्याची पेंड कुऱ्हाडीनें बारीक तुकडे करून देऊं लागला. अहाहा, काय रुचकर लागायची ती पेंड. मला वाटायचें भरपूर पेंड खावी; पण किसन अगदीं मोजकीच पेंड देई.

मी पाणी पिण्याचा कंटाळा करी. पेंडीमुळें मी भरपूर पाणी पिऊं लागलों. मी पाणी प्यालों कीं, किसनला बरें वाटे.

लक्षा, पक्षा, सज्जन आणि महाजन आम्ही सगळे एके ठिकाणीं राहात होतों. सगळेजण खुषींत होतों. आम्हां सगळ्यांना ओलें गवत आणि पेंड नियमानें मिळत होती. आईचें दूध मात्र आतां कमी कमी मिळूं लागलें. आई धन्याला दूधच देईनाशी झाली, तरच आम्हांला प्यायला सोडीत. गाईच्या दुधाला गांवांत फार मागणी होती. लहान मुलांना गाईचें दूध हवें असतें ना!

रखमाबाई धाराधुरा झाल्या कीं, दुधाच्या चरव्या पाटींत घालून रतीब घालून येई. आम्हांला आईकडे प्यायला सोडलें नाहीं कीं, आजी तिच्या सुनेला म्हणजे रखमाबाईला रागें भरे; आमच्या आईच्या दुधाच्या जोरावर तर ती एक एक दागिना करीत होती. आम्हांला आईचें दूध फार आवडायचें; पण रखमाबाईला वेळा हव्या होत्या, पुतळ्याची माळ हवी होती. त्यासाठीं तिनें आमचें दूध तोडलें. काय करावें या रखमाबाईला?

☆ ☆ ☆




# ३. पावसानें डोळे वटारले

आमचा घरधनी दादू मोठ्या चिंतेंत पडला. आजी कपाळाला हात लावूं लागली. रखमाबाई धसफस करूं लागली.

पाऊस मुळींच पडेना. सगळीं नक्षत्रें कोरडीं गेलीं. रोहिणी पडल्या नाहींत, तेव्हां लोक म्हणूं लागले मृग पडेल. मृग पडला नाहीं, तेव्हां लोक म्हणूं लागले आर्द्रा पडतील. आर्द्रा कोरड्या ठणठणीत गेल्या तेव्हां पुनर्वसु नक्की पडेल असें वाटलें; पण कसलें काय अन् कसलें काय ! पुनर्वसु नक्षत्राचासुद्धां पाऊस पडला नाहीं. पुष्य नाहीं, आश्लेषा—मघा नाहींत, कांहीं नाहीं. सगळा पावसाळा कोरडा गेला. उगाच अधूनमधून कधींमधीं धुरळा उधळल्यासारखा पडला बिचारा ! त्याचा काय उपयोग ? पाऊस पडला नाहीं. त्यानें विहिरी बारवा आटून गेल्या. जमिनींत फक्त ढेकळें उरलीं.

आमचे हाल होऊं लागले. माझ्या सोबत्यांना दादूनें मंचरचा बाजार दाखवला. लक्षा घेतला एका नंदीबैलवाल्यानें विकत. पक्षा घेतला हुसेन तेल्यानें. सज्जन नेला एका गाडीवाल्यानें आणि महाजनला घेतलें एका छकडेवाल्यानें. दादू एकीकडे हकीकत सांगायचा आणि एकीकडे मुसमुसून रडायचा. दादू आणि त्याच्या घरचीं सारीं माणसें माझ्या सोबत्यांवर माया करीत होतीं. केवळ आजीच्या सांगण्यामुळें मला मंचरचा बाजार पाहावा लागला नाहीं.

कसें तरी मी तें खडतर साल निभावलें. मग आगोठ आली. थोडाफार पाऊस झाला. भाद्र्याच्या महिन्यापर्यंत तर मी मस्त दिसूं लागलों. डरकाळ्या फोडूं लागलों. मस्ती करूं लागलों.



डॉक्टर आल्यावर मला दोऱ्याच्या फांसांत अडकवून खालीं पाडलें.

माझ्या गळ्याला सुंदर पोळी सुटूं लागली. वशिंड डौलदार दिसूं लागलें. माझ्या डोळ्यांकडे आणि शिंगांकडे पाहूनच लहान मुलें घाबरूं लागलीं. लोक दादूपाटलाला म्हणूं लागले, "वडवा याला."

दादू म्हणूं लागला, "नको, अजून हा बच्चा आहे."

लोक म्हणूं लागले, "पुढंमागं त्रास होईल बरें."

अखेर एक दिवस जनावरांचा डॉक्टर आला. मला दोऱ्याच्या फांसांत अडकवून पाडून ठेवलें आणि घट्ट दाबून धरलें. डॉक्टरनें आपल्या हातांतला चाप घट्ट दाबला. मला प्राण जाईल असें वाटलें. खूप घामानें डबडबलों मी, नंतर माझी सुटका झाली.

यामुळें माझ्या डरकाळींत जोर राहिला नाहीं. माझा आवाज गाईसारखा मंजुळ येऊं लागला. माझ्या वशिंडाचा डौल पार गेला. मानेखालची पोळी सुकून गेली. मला फार वाईट वाटूं लागलें. पण घरधनी व घरांतली माणसें म्हणूं लागलीं, आतां पांडा शांत होईल.

☆ ☆ ☆



# ४. चौघांच्या चार वाटा


लक्षा घेतला होता एका नंदीबैलवाल्यानें. लक्षाचें शेत आणि घर म्हणजे एक माळरान ! माळरानाखेरीज बाहेरचें जग त्याला माहीत नव्हतें. त्यामुळें तो मोटारीला बुजूं लागला, सायकलीला बुजूं लागला; लक्षाला पालावर नेईपर्यंत नंदीबैलवाल्याला फार त्रास झाला. एक-दोनदां लक्षानें ओढ घेतल्यानें तर नंदीबैलवाला घसरला आणि त्याच्या हाताला खरचटलेंसुद्धां.

ही मजा पाहात बांधावर एक मुलगा उभा होता तो म्हणाला,

"अरे अरे नंदीबैला वेसण टोचीन तुझ्याच नाकाला ।
गडबड करशील तरी, भिणार नाहीं तुझ्याच बापाला ।। १ ।।"

लक्षा टवकारून त्या वात्रट मुलाकडे पाहूं लागला. त्या मुलाला हुंदडून उताणेच्या पाताणें पाडायचा लक्षानें बेत केला; पण तो मुलगा सावध होता आणि नंदीबैलवाला गहाळ नव्हता. नंदीबैलवाला त्या वात्रट पोराला म्हणाला, "खरं आहे, छोटे धनीसाहेब ! मी आतां पालावर गेल्या गेल्या याला वेसणच ठोकणार आहे."

थोड्याच वेळांत लक्षाची स्वारी पालावर पोहोंचली. नंदीबैल-वाल्यानें आपल्या एका दोस्ताला बोलाविलें. त्या दोघांनीं मिळून लक्षाची मान एका झाडाच्या बुंध्याला घट्ट बांधून ठेवली आणि मग दयामाया न दाखवितां नंदीबैलवाल्यानें लक्षाच्या नाकपुडींतून दाभण आरपार काढला आणि नाकपुडींतून एक भक्कम सुतळी ओवून ती मोहरकीला बांधून टाकली.



नंदीबैलवाला आतां लक्षाला गांवोगांव फिरवूं लागला.

लक्षानें कांहीं निमूटपणानें वेसण नाहीं ठोकूं दिली. सगळे पालवाले जमले. त्यांनीं लक्षाला दोरीनें पक्का आवळला आणि मग त्याच्या नाकपुडींतून आरपार दाभण काढला. रक्तबंबाळ झाली होती लक्षाची नाकपुडी.

मग लक्षाला " पाऊस पडल का ? " " होय जी, होय जी, " करून मान उभी हालवायला शिकवलं. " नको, नको, " म्हणून मान आडवी हालवायला शिकवलं. फार हाल केले नंदीबैलवाल्यानें लक्षाचे.

मोट ओढून दमून गेल्यावर मोट ओढणाऱ्या बैलांना पेंड मिळते. टांगा ओढून दमल्यावर घोड्याला हरभऱ्याचा तोबरा मिळतो. गाईनें भरपूर दूध दिलें तर तिला घमेलेंभर आंबोण मिळतें. असेंच आहे जग !


लक्षा फिरत फिरत धन्याबरोबर आमच्या गांवीं आला होता; तेव्हां त्यानें मला ही हकीकत सांगितली. मला फार वाईट वाटलें; पण करणार काय मी ?


पक्षा तर काय माझ्या गांवांतच आला. हुसेन तेल्याकडे त्याला खायला चांगलें मिळे; पण डोळ्यांवर घट्ट ढापणें लावून दिवसभर घाण्याभोंवतीं फिरावें लागे. त्यानें पक्षाला चक्कर येई.

सज्जनच्या पायाला पत्र्या मारल्या आणि त्याचा गाडीवान पुण्याच्या खेपा करूं लागला. सज्जनच्या जोडीला दुसरा एक बैल होता, त्यानें सज्जनला फार त्रास दिला.

महाजनचा छकडेवाला छकड्यांत खूप अवजड ओझें लादायचा आणि उन्हातान्हांतून, पावसापाण्यांतून खेपा घालायला लावायचा.

अशा प्रकारें माझे चाऱ्ही सोबती निरनिराळ्या ठिकाणीं गेले.





## ५. वैदीण बया

वैदीण बया आली आणि लहान लहान मुली घरांत दडूं लागल्या. मोठ्या बायांनीं लहान मुलींना शोधून काढलें आणि वैदीण बयापुढें आणलें.

वैदीण बयानें डोक्यावरचा झोळणा अंगणांत ठेवला. हातांत एक सुई घेतली. तोंपर्यंत एक दोन बायांनीं एका लहान मुलीला घट्ट धरिलें.


वैदीण तोंडानें "कांदा खाती कुरुकुरु, सासरी जाती तुरुतुरु, पाणी आणती भुरुभुरु," असं गाणं म्हणूं लागली आणि हातानें टचाटचा कपाळावर गोंधूं लागली. मुलगी रडतच होती. बायांनीं तिला घट्ट पकडलें होतें. कपाळावरचें गोंधण, हातावरचें गोंधण, बोटावरचें गोंधण होईपर्यंत तिला सोडलें नाहीं. मग मुलीला मोकळें सोडलें.

आम्हांला देखील माणसें अशाच प्रकारें पकडून ठेवतात आणि कानांत बाळी ठोकतात, कान कातरतात, शिंगें साळतात आणि त्यांत शोभेसाठीं पितळी टोपणें बसवतात. आम्ही अगदीं माणसाच्या ताब्यांत राहावें म्हणून नाकपुडी फोडून वेसण घालतात. आमच्या पायाला पत्र्या ठोकतात. यामुळें आम्हांला त्रास होतो. आम्हांला वडवण्याची जुनी पद्धतसुद्धां फार त्रासाची आहे; पण करतां काय ? सर्व त्रासांतून आम्हांला जावेंच लागतें.

एकदां काय झालें. रानांत मांडवाच्या सावलींत मला बांधलें होतें. आमच्या घरचीं सर्व मुलें माणसें शेतावर आलीं होतीं.

मोठालीं माणसें शेतावर काम करीत होतीं आणि लहान मुलें मांडवा-भोंवतीं खेळत होतीं. खेळतांना सरमाडाच्या काड्या टोंचून मुलें मला सारखीं त्रास देत होतीं. मीं डोकें हालवून पाहिलें, लाथा झाडून पाहिलें, मुलें कांहीं मला दाद देईनात. तेव्हां मीं ताडकन् दावें तोडलें आणि मुलांच्या मागें लागलों. मुलांच्या पळापळींत एक दोघे चांगलेच आपटले. मुलें घाबरून ओरडूं लागलीं. तेव्हां मालक धांवत धांवत माझ्याकडे आला व त्यानें पुन्हा मला बांधलें. माझ्या-बद्दल धन्याची खात्री होती. त्यानें मुलांत चौकशी केली. तेव्हां मुलांचाच उनाडपणा त्याला आढळून आला. मग मुलांनाच त्यानें चोपलें. जर धन्याला माझा स्वभाव माहीत नसता तर त्या दिवशीं फुकटाफाकट मला मार खावा लागला असता.


दावें तोडल्याच्या निमित्तानें मला आतां लोखंडी साखळीनें बांधूं लागले. असेंच मला बांधून ठेवलें होतें. भर दुपारची वेळ होती. ऊन कडक पडलें होतें. धन्यानें टाकलेलें ओलें कडबळ मी




तेव्हां मी ताडकन् दावें तोडलें आणि मुलांच्या मागें लागलों.

खात होतों. आमच्या येथें एक पाहुणें पोर आलें होतें. तें चोरून मारून विड्या ओढी, सिगरेटी ओढी. आमच्या घरांतल्या बाबूला त्यानें नादाला लावलें. ते दोघे सिगरेट ओढीत मांडवाच्या आडोशाला बसले. नेहमींप्रमाणें दुपारचीं जेवणें उरकून विसाव्यासाठीं मोठीं माणसें आंब्याच्या गर्द छायेंत थोडा वेळ लवंडलीं होतीं. मुलांच्या हलगर्जीपणानें मांडवाला लागली आग! मी मोठ्यानें डरकाळ्या फोडूं लागलों. माणसांचें लक्ष वेधलें आणि हरप्रयत्न करून त्यांनीं आग विझवली. नाहींतर त्या आगींत मी होरपळून मरून गेलों असतों. साधें दावें असतें तर तें मीं कसेंहि तोडलें असतें. पण यावेळीं माझ्या गळ्यांत साखळदंड होता ना! त्यानें माझा उपाय चालेना. आगींतून मी बचावल्यावर धन्यानें पुन्हा मला साधें दावें लावलें. आगीनें फक्त मांडवच जळाला. बाकी जवळपासची वैरण शाबूत राहिली.

धन्यानें त्या रात्रीं देवानें संकट टाळलें म्हणून पुरणपोळीचा स्वयंपाक करण्याचा हुकूम सोडला. म्हातान्या आजीनें माझ्यापुढें चांगलें चुंगलें खाणें ठेवायला सांगितलें.






# ६. महाजनचा छकडा

महाजनला त्याचा धनी सकाळीं आठाला छकड्याला जुंपी. दुपारीं थोडा वेळ विसावा देई कीं, मग रात्रीपर्यंत पुन्हा छकडा त्याच्या मागें असेच.

जुन्नर ते एडगांव, एडगांव ते हिवरें, हिवरें ते नारायणगांव, नारायणगांव ते रांजणी, नारायणगांव ते बोरी, उंब्रज ते जुन्नर, जुन्नर ते ओतूर अशा सारख्या खेपा महाजनला कराव्या लागत. रस्ता वाईट आणि छकड्यांत ओझें शिगोशीग, त्यामुळें महाजनचा जीव अगदीं मट्टयास येई.

एके दिवशीं महाजन नारायणगांवाहून बोरीला छकडा घेऊन चालला होता. गुळाच्या ढेपा, गोड्या तेलाचे डबे, तांदुळाचीं पोतीं असा माल छकड्यांत भरलेला होता. मोठ्या कष्टानें महाजन उन्हांतून छकडा ओढीत होता. छकडेवाल्याला आज घाई झालेली होती. महाजननें जलद चालावें म्हणून तो चाबकाच्या वादीनें, चाबकाच्या दांडीनें सारखा मारूं लागला. आज छकडेवाल्याला काय झालें होतें कोण जाणे. एक-दोनदां त्यानें महाजनला दाभण टोंचला. तें कांहीं महाजनला सहन झालें नाहीं. महाजन जोरानें छकडा ओढूं लागला खरा, पण रागाच्या भरांत त्यानें तो एका उंच दगडापाशीं नेऊन उलथून टाकला! आतां छकडेवाला चांगलाच पस्तावला. त्याला आपली चूक कळून आली. छकड्याच्या दांड्या मोडून गेल्या होत्या. माल मातींत पडला होता. जवळपास माणसाची मदत मिळण्यासारखी नव्हती. बराच वेळ गेल्यावर सुताराला निरोप



रागाच्या भरांत महाजननें छकडा उलथून टाकला.

पोहोंचला, छकडा नीट झाला आणि मग छकडा वोरीला गेला. तेव्हांपासून मात्र छकडेवाला महाजनला दाभण टोंचीत नाहीं कीं फारसा मारीत नाहीं. कांहीं छकडेवाल्यांच्या चाबकाच्या दांडीला मागल्या बाजूला अणकुचीदार चूकच ठोकलेली असते. ती चूक ते आम्हां बैलांच्या पाठींत खुपसतात. किती वेदना होत असतील बरें आम्हांला. चूक किंवा पराणी टोंचल्यानें रक्त निघतें, वेदना होतात आणि जखमेवर माशा घोंगावतात. त्या शेपटीनें वारतां वारतां आमची पुरेवाट होते. त्यांतच जड ओझें ओढण्याचें काम करावें लागतें. तोंडाला कोरड पडली तरी लवकर पाणी प्यावयास मिळण्याचें चिन्ह नसतें.


ओझीं वाहून वाहून महाजनचा खांदा सुजला होता. कोणी-तरी म्हाताऱ्या खाकी कपडेवाल्यानें छकडेवाल्याला दम दिला. तेव्हां मात्र "घारुडदादा, नेतोंच का मी याला उद्यां गुरांच्या दवाखान्यांत. आतां मला अडवूं नका, पायां पडतों तुमच्या." असें

म्हणत म्हणत आठ आणे छकडेवाल्यानें घारुडदादाच्या खिशांत टाकले आणि छकडा हाकारला.


महाजनचा खांदा दुखतच होता. त्यावर जूं घासतच होतें. बिचारा महाजन! बरेच दिवस पुरवलें त्याला हें खांद्याचें दुखणें.

छकडेवाला सुजलेल्या खांद्यावर घेरू चोळी, काव चोळी, थोडा फार दवा करी. त्यानें का बरा होणार होता तो खांदा!

खांदा बरा होण्यासाठीं महाजनला पूर्ण विश्रांतीच हवी होती. पण ती त्याला मिळाली नाहीं आणि त्याचा खांदा लवकर बरा झाला नाहीं.



म. ग्रं. स. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. नों. दि ..........
वि. ......... ... क्र. .. ...............



# ७. सज्जन आणि दुर्जन

सज्जनला अवसरीच्या राणबा शिंद्यानें विकत घेतला होता. राणबा गाडीवानाचा धंदा करी. राणबाजवळ दुसरा बैल होता. त्याचें नांव होतें शिंगऱ्या. शिंगऱ्याचें आणि जोडीदाराचें कधीं पटायचें नाहीं. जोडीदाराशीं भांडण्यांत शिंगऱ्या पटाईत होता. शिंगऱ्या जोडीदारापुढची वैरण खाई आणि त्याला शिंगानें कोचाळी. शिंगऱ्या गाडीला जुंपला कीं, जोडीच्या बैलाकडे ओझ्याचा भार जाईल असें करी. जोडीदाराशीं कधीं सुतानें तो वागायचाच नाहीं. त्यामुळें राणबाच्या हातचा मार दोघांनाहि खावा लागे.

शिंगऱ्यासारख्या दुर्जनामुळें माझ्या सज्जन सोबत्याला मार बसे. बटाट्याची खेप घेऊन जेव्हां राणबा हिवऱ्याला येई तेव्हां नदीवर माझी आणि सज्जनची गांठ पडे. पाणी पितां पितां आम्ही सुखदुःखाच्या गोष्टी करीत असूं.

बटाट्याच्या गाड्या ओढून ओढून सज्जन अगदीं धुपून गेला होता आणि त्यांत त्याला संगतीला मिळाला होता शिंगऱ्या.


पाणी पिण्याच्या निमित्तानें एकदां सज्जन, मी व शिंगऱ्या एकत्र आलों. खोडी काढून त्रास देण्याच्या निमित्तानें त्यानें एक डरकाळी फोडली. मीं त्याला डरकाळीनें उत्तर दिलें. तो माझ्याकडे धांवत आला. मी त्याच्याकडे धांवत गेलों. आतां आमची चांगलीच जुंपली. राणबाला हो हो करतांना पुरेवाट झाली. माझा सोबती सज्जन याला त्रास दिल्याबद्दल माझ्या मनांत राग होताच. मीं शिंगऱ्याला थेट नदीच्या कांठाला नेऊन लोळवलें. या गडबडींत शिंगऱ्याचें शिंग दुखावलें आणि पुढें तें मोडून पडलें.

शिंगऱ्याला आतां ' शिंग मोडका बैल, शिंग मोडका बैल, ' म्हणूं लागले. शिंगऱ्याच्या रूपाचा डौल नाहींसा झाला. राणबानें त्याला मंचरचा बाजार दाखविला आणि ठोकून टाकला!

आतां सज्जनच्या जोडीला चांगला बैल आहे. तो आणि सज्जन एक दिलानें काम करतात. त्यामुळें राणबा शिंदे खुशींत आहे.


माल उतरून टाकल्यावर मोकळी गाडी नेतांना सज्जन आणि त्याचा जोडीदार आपण होऊन गाडी घेऊन पळतात. त्यांच्या गळ्यांतल्या घुंगरांचा मोठा मजेदार आवाज येतो. त्या आवाजांत राणबा आपला आवाज गाणें गात मिसळतो.

चल पवळ्या, चल ढवळ्या।
चल राजा चल सरजा।
कमाईला बरकत तुमच्यामुळं रं।
कसा बरं विसरूं तुम्हांला रं।



शिंगऱ्याला मीं थेट नदीच्या कांठाला नेऊन लोळविलें.

लावीन ओला टकळा तुम्हांला  रं।
आणिन नामी पेंड तुमच्यासाठीं  रं।
धुवुन शान काढीन तुम्हांला रं।
पोहायला नेईन तुम्हांला रं।
पोरं आलीं वाटेमंधी।
नका मारूं त्यांना कंधी।
करीन धनीन पिरती  रं।
बिगि बिगि चाल माझ्या काळजा रं॥






## ८. प्रदर्शनाला जातांना

सगळें हिवरें गांव मला नांवाजीत होतें. माझ्यावर डॉक्टरांनीं खच्ची करण्याचा प्रयोग केला होता. पण तो कांहीं साधला नाहीं, असें गांवकरी म्हणत. कारण माझें वशिंड डौलदार दिसूं लागलें होतें. माझी मानेखालची पोळी भरदार झाली होती. माझी डरकाळी दुसऱ्या बैलांना भिववीत होती. माझ्या डोळ्यांतली रागीट तांबूस झाक पाहून पाहुणे मंडळी मला जरा बिचकत. मीं सहज जरी रोखून पाहिलें तरी बाया माणसें घाबरून जात. अगोदरच मी लाडका होतों आणि माझा धनी दादू आणि त्याचा मुलगा किसन यांच्या प्रेमळ वागणुकीनें मी अधिकच लाडावलों होतों.

उंब्रज, जुन्नर, नारायणगांव, आळें, बेल्हें येथील शेतकरी देखील माझें नांव घेत, कीं पांडा प्रदर्शनाला पाठविण्याला लायक आहे. माझें अंगपिंड मजबूत असून त्यांत माझ्या पांढऱ्याशुभ्र रंगानें अधिकच शोभा आली होती.

प्रदर्शन महिन्यावर आलें होतें. माझ्या खाण्यापिण्याची चंगळ चालली होती. अखेर प्रदर्शन चार दिवसांवर आलें. प्रदर्शन आळंदीला भरणार होतें. किशा, मी व दादू प्रदर्शनाला निघालों, पण मी सडकेनें सारखा बुजूं लागलों. पांखरूं उडालें बूज, मोटार आली बूज, सायकल गेली बूज, यामुळें किसन व दादू अगदीं कंटाळून गेले.

बुजण्याच्या या धालमेलींत माझा मागला पाय दुखावला आणि मी लंगडत चालूं लागलों. मोठ्या कष्टानें आम्ही आळंदीला येऊन पोहोंचलों. आळंदीला आल्यावर पहिल्या प्रथम मला गुरांच्या



सगळा शिवार जणूं कांहीं बैलांनीं फुलून गेला होता.

दवाखान्यांत जावें लागलें. जो तो शेतकरी येई आणि मजकडे पाहून हळहळे. शेतकरी म्हणत "मोठं उमदं जनावर पण जायबंदी झालं बुवा!" प्रदर्शनाला लांब लांबून बैल आले होते. सगळा शिवार जणूं कांहीं बैलांनीं फुलून गेला होता. त्यामुळें वैरणीचा भाव कडाडला होता. पेंड महागली होती. शेतकरी मोठ्या हौसेनें बैल घेऊन आले होते. ते काय असल्या महागाईला भितात! आम्हां सर्व बैलांचा खाण्यापिण्याचा, आंघोळीचा मोठा बेस बेत होता. माझा पाय दुखावल्यानें मला पोहण्याची बंदी होती. त्यामुळें मला फार वाईट वाटे. पायहि दुखायचा थांबेना. माझी मोठी कुचंबणा झाली.

कांहीं बैल स्वतःच्या रंगारूपाच्या अभिमानानें फुगलेले असत. ते माझ्याकडे न पाहतांच पुढें जात. कांहीं जणांना माझी दया येऊन ते माझी चौकशी करीत. बैलांच्या माती उकरण्यानें, डरकाळ्यांनीं सारी आळंदी दुमदुमून गेल्यासारखी वाटली मला.

☆ ☆ ☆



# ९. प्रदर्शनाच्या आवारांतून घरीं

प्रदर्शनाच्या आवाराला चार बाजूंला चार मोठ्या कमानी उभारल्या होत्या. कमानीवर बैलांचीं चित्रें काढलेलीं होतीं. सोरटी बैल, पंढरपुरी बैल, खिलारी बैल, गांवरानी बैल, खानदेशी बैल यांचीं हुबेहूब चित्रें आवारावर बाहेरच्या बाजूनें काढलेलीं होतीं.

प्रदर्शनाचें आवार रंगीबेरंगी पताकांनीं शोभिवंत केलेलें होतें. आवारांत आम्हांला पाणी पिण्यासाठीं ठिकठिकाणीं हौद बांधले होते. निरनिराळ्या रंगांच्या बैलांसाठीं निरनिराळे गाळे होते. शिवाय निरनिराळ्या जातींसाठीं निरनिराळे गाळे होते. आम्हांला उन्ह लागूं नये म्हणून सावलीसाठीं ताडपत्र्या गाळ्यावर बांधलेल्या होत्या. आखूड शिंगाचे, लांब शिंगाचे, सरळ शिंगाचे, बाकदार शिंगाचे हजारों बैल तेथें दिसत होते. बैल अधिक शोभिवंत दिसण्यासाठीं हौशी धन्यांनीं आपल्या बैलांच्या शिंगांना पितळी चकाकणाऱ्या शेंबी बसविल्या होत्या, तर कोणी रंगीबेरंगी आरसपानी म्होरक्या बैलांना घातल्या होत्या. घुंगुरमाळा, दृष्टमणी तर बहुतेक बैलांच्या गळ्यांत होते.

आपला बैल फार माजोरा आहे हें पाहाणाराला कळावें म्हणून कांहीं धन्यांनीं आपले बैल मुद्दाम दोन दाव्यांनीं दोन खुंट्यांना बांधले होते.

पाहाणारे कोणी मोरा बैल पसंत करीत; तर कोणी बांडा बैल पसंत करीत. एकरंगी बैल सगळ्यांना एकदम पसंत पडत. त्यांत मग पाहाणारे जोड्या ठरवीत.



कागद मिळाल्यामुळें किसन तर अगदीं फुगून गेला.

गांवरानी बैलांच्या गाळ्यांत पांढऱ्या रंगाच्या बैलासाठीं एक विभाग होता. त्यांत माझा नंबर होता. पण माझा मलाच मी कमी प्रतीचा वाटूं लागलों.

" एकाहुनि चढ एक जगामधिं थोरपणाला मिरवुं नको. "

अशी ओळ किसन नेहमीं गुणगुणत असे, ती मला आतां वारंवार आठवूं लागली.

पहिल्या नंबरचा बैल ठरविण्यासाठीं पंच कमेटी साऱ्या प्रदर्शनभर हिंडली. पंचांनीं काळजीपूर्वक जनावरें पाहिलीं. पंचांपैकीं एकाच्या मनांत मी कांहींसा भरलों; पण दुसरा तो अतिशय डौलदार उभ्या शिंगाचा पांढराफेक बैल पाहिल्यावर त्याचा बेत फिरला.

पंचांचा एक विचार झाला. महाळुंग्याच्या शिवळे पाटलांच्या बैलाचा नंबर पहिला लागला. माझ्या वांट्याला एक सुंदर नक्षी काढलेला कागद आला. त्यावर एका मंत्र्याची सही होती.


कागद मिळाल्यामुळें माझ्या धन्याला म्हणजे दादा पाटलाला बरें वाटलें. किसन तर अगदीं फुगून गेला.

आतां माझा पाय बरा होत आला होता. आम्ही आळंदीहून हिवऱ्याला यायला निघालों. वाटेंत जें गांव लागेल तेथें माझा हौशी धनी माझ्यापुढें ताशा लांवी व मिरवणुकीनें मी त्या गांवांतून जाई. चाकणला ताशा लावला होता. खेडला तर ताशा, ढोल आणि लेजीम यांचा ताफा होता.

पेठ सोडल्यावर आम्ही मंचरला आलों. मंचरला माझ्या धन्याचा सोयरा सडकेलाच राहात होता. बाबुराव लोंढे त्याचें नांव. त्यानें पुरणपोळीचा बेत केला होता. मला विहिरीवरचा ताजा घास त्यानें खाऊं घातला.

हिवऱ्यापाशीं येऊन पोहोंचलों, तेव्हां संध्याकाळच्या पांचाचा सुमार होता. थोडा विसांवा झाल्यावर गांवकऱ्यांनीं माझी मोठी मिरवणूक काढली. जशी कांहीं लग्नाची वरातच. माझ्या अंगावर सुंदर झूल घातली होती. पोळ्याच्या बैलासारखें मला नटवलें होतें. सुवासिनींनीं माझ्या पायावर पाणी घातलें. माझ्या कपाळीं कुंकूं लावलें. माझी पूजा केली. मला गव्हाचे दाणे व गुळाचा खडा चारला. मिरवणूक सुरू झाली. ताशे, सूर, सनई, ढोल-लेजीम आणि मधून मधून शिंग वाजूं लागलें. अशा थाटांत मी दादा पाटलांच्या वाड्यांत येऊन पोहोंचलों. मला पाहिल्यावर घरांतल्या माणसांना आनंद झाला. म्हाताऱ्या आजीनें आपल्या कानसुलावर कडाकडा बोटें मोडून घेतलीं व मला आयुष्य चिंतिलें.

☆ ☆ ☆



# १०. बैल पोळा

आमच्या हिवऱ्याला पोळा भाद्रपदांत करतात. कांहीं ठिकाणीं पोळ्याचा सण श्रावणी अमावास्येला साजरा करतात.

श्रावणी पोळा करण्याचें कारण अगदीं उघड आहे. घाटावर पाऊस अधिक पडतो. जरा अगोदर पडतो आणि आम्हां बैलांना ओला चारा अगोदर मिळतो. श्रावणी अमावास्येपर्यंत आम्ही चांगलें आंग धरतों. आम्हांला चांगलें बाळसें येतें. आगुठीच्या अगोदर नांगरट झाल्यावर आम्हांला या दोन तीन महिन्यांत मेहनतीचें काम जवळ जवळ नसतेंच. कोंवळा ओला चारा खावा; रवंथ करावा. पुन्हा कोंवळा ओला चारा खावा, रवंथ करावा; असें आमचें चाललेलें असतें. केवळ मी चांगला दिसावा, धष्टपुष्ट दिसावा यासाठीं मला माझा धनी शिवनेरीच्या मागें चारणीला पाठवीत असे. यंदाहि मी चारणीला जाऊन भाद्रपदांत हिवऱ्याला परत आलों.

सबंध भाद्रपद महिन्यांत मला हिवऱ्याला भरपूर ओलें खायला मिळालें. यामुळें सगळ्या हिवऱ्यांत माझा नंबर पहिलाच राहिला.

यंदा पोळा मंगळवारीं होता. माझा धनी दादू, त्याचे मुलगे नाथा आणि कृष्णा रविवारीं जुन्नरच्या बाजाराला गेले. आमच्यासाठीं त्यांनीं बेगड, बाशिंगें, हिंगूळ, म्होरक्या, घुंगुरमाळा, दृष्टमणी आणले. माझ्यासाठीं एक नवी झूल आणली.

मंगळवार उजाडला. आम्हां बैलांचा हा सण. पण आज गोठ्यांतल्या सगळ्याच गुरांची चंगळ होती. गाई, म्हशी, बैल,

वासरें सर्वच आम्ही संगतीनें आज नदीवर पोहायला गेलों. वर्षांतून आम्ही सगळीं जनावरें याच वेळीं एकदम पोहायला जातों.

दादू, नाथा व कृष्णा यांनीं गायांना, म्हशींना वासरांना आम्हांला चांगलें धुतलें. नंतर आम्हांला थोडा वेळ माळरानावरून फिरवून घरीं आणलें. सर्व जनावरांना रंगविलें. आमच्या शिंगांना बेगड चिकटविलें. वासरांना दृष्टमण्यांच्या माळा घातल्या. म्हशींच्या गळ्यांत एक एक घुंगुर अडकविलें. गाईंच्या गळ्यांत घाट्या बांधल्या. माझ्या गळ्यांत म्होरकी, घुंगुरमाळ शिवाय पितळी साखळी घातली. शिंगांना बेगड लावून कपाळावर गोंडे बांधले. आरशा-आरशांचें बाशिंग माझ्या कपाळावर बांधलें. वाघाचीं चित्रें असलेली झूल माझ्या अंगावर घातली.

घरांत आज पुरणपोळीचा स्वयंपाक केला होता. आम्ही मारुतीच्या पायां पडून आल्याखेरीज आज कोणीहि जेवणार नव्हतें.



आमची मिरवणूक मारुतीच्या दर्शनाला निघाली.

तेव्हां आमची मारुतीच्या देवळाकडे जाण्याची गर्दी सुरू झाली. गुरव व मांग यांना बोलावणें गेलें. मांग डफडें वाजवूं लागला. गुरव शिंग फुंकूं लागला. महार-मंडळींच्या सनया व सूर तयारच होते. आमची मिरवणूक निघाली. मारुतीपुढें सलामी देण्याचा पहिला मान पाटलांच्या बैलांचा होता. पाटलांचे बैल मारुतीच्या देवळापुढें आले. जुने माहीतगार बैल मुकाट्यानें सलामी देत होते. नवे खोंड जरा कां कूं करीत होते. पाटलाच्या गड्यानें खोंडांना बळेंच मारुतीपुढें वाकविलें.

पाटलांच्या बैलांनीं मारुतीला उजवी घातली व ते वाजत गाजत घरीं गेले. आतां माझी पाळी आली. माझ्यावर गांवाच्या लोकांचें फार लक्ष. "पांडा, पांडा" म्हणतांच मी चावडींतल्या मंडळीकडे मान उंच करून, कान उभे करून, डोळे मोठे करून प्रेमानें पाहिलें. माझें वागणें कारभारी लोकांना पसंत पडलें.

सोनूकाका म्हणाला, "पाहा कसा गुलाम आपल्याकडे पाहातो आहे."

चावडींतल्या मंडळींनीं माना डोलावल्या.

दुसरा म्हातारा म्हणाला, "यालाच अवंदा परदरशनांत बक्षीस मिळाया होवं होतं."

सोनूकाका म्हणाला, "चालायचंच, आपलं प्यार आपल्याला चांगलंच दिसायचं."

किशा म्हणाला, "पांडा, मारुतीला सलामी दे."

नाथा व दादू नुसते माझ्याकडे पाहात राहिले. मी झटदिशीं माझे पुढचे पाय दुमडले व मान लवविली आणि उठलों सुद्धां. दादूच्या तोंडावर हासूं उमटलें. आणि नाथा तर मोठमोठ्यानें हसायला लागला. शेजारचा महादू म्हणाला, "काय रे नाथा, पांडाला घरीं शिकवलं कीं काय?"


नाथा म्हणाला, "नांव कशाला मर्दा, आमच्या पांडाला काय शिकवाया लागतं व्हय ?"

माझ्या सलामीनंतर इतर बैलांची व छोट्या वासरांची सलामी झाली. आम्ही मारुतीच्या देवळाला उजवी घातली व वाजत गाजत घरीं आलों. घरीं आल्याबरोबर आमच्या पायांवर घरांतल्या सुवासिनींनीं पाणी घातलें. आम्हांला हळदकुंकू लावलं. आमची पूजा केली. आम्हांला पुरणपोळीचा नैवेद्य खाऊं घातला आणि मग सारीं माणसें जेवायला बसलीं.

आम्हांला आज भरपूर ओलें खावयास होतें. आम्ही खातां खातां एकमेकांशीं सुखदुःखाच्या गोष्टी बोलत होतों.

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.





# ११. खंडोबाची जत्रा

हिवऱ्यापासून निंबगांवदावडी तसें कांहीं फार लांब नाहीं.

हिवऱ्यापासून नारायणगांव अडीच कोस, नारायणगांवापासून मंचर चार कोस, मंचरापासून पेठ तीन कोस, पेठेपासून खेड तीन कोस आणि खेडापासून निंबगांव तीन कोस, म्हणजे हिवऱ्याहून एका दिवसांत निंबगांवला जातां येतें.

कांहीं लोकांचा खंडोबा जेजुरीचा आहे; तर कांहीं लोकांचा खंडोबा निंबगांवचा आहे.

जुन्नर खेड भागांतल्या पुष्कळ लोकांचा खंडोबा निंबगांवचा.

खंडोबाच्या दर्शनाला पौर्णिमेला जातात. चैत्री पौर्णिमा, पौषी पौर्णिमा, माघी पौर्णिमा यावेळीं फार गर्दी होते.

पौर्णिमेला खंडोबाच्या टेकडीवर गाडे उडवतात म्हणजे गाड्यांच्या शर्यती लागतात. आम्ही बैल गाडे ओढतों. ओढतों कसले ! पळवीत नेतों. ज्याचा पहिला नंबर लागेल त्याला मानाचा नारळ पागोटें देतात आणि शिवाय भरपूर इनाम पण मिळतें.

पहिल्यापासून मला पळण्याचा भारी नाद. माझ्या जोडीला धन्यानें सरजा घेतला होता. त्याला पळायच्या खुब्या मीं समजावून दिल्या होत्या.

निंबगांवला तुफान यात्रा जमली. गांवोगांवचे गाडे शर्यतींत भाग घ्यायला आले होते.

चासेच्या राक्षे यांचा गाडा व बैल, हिवऱ्याच्या दादूचा गाडा व बैल, घोडेगांवच्या काळे पाटलाचा गाडा, जुन्नरच्या बुट्टे

पाटलाचा गाडा, अवसरीच्या शिंद्यांचा गाडा, थोरांदळ्याच्या एका मारवाड्याचा गाडा. सगळे लोक पाहून जात आणि म्हणत यांतला कोणता तरी एक पहिला येणार. कोणी मारवाड्याच्या गाड्याचा पहिला नंबर येईल म्हणे, तर कोणी दादू हिवरेकराच्या गाड्याचा नंबर पहिला येईल, असें बोले. कांहींनीं बुट्टे पाटलांचा गाडा पहिला येईल, असा निकाल देऊनसुद्धां टाकला!

गाड्यांच्या शर्यतीचा दिवस उजाडला. जो तो गाड्यांच्या तयारीला लागला. आम्हां बैलांकडे प्रत्येक धनी बारकाईनें लक्ष देऊं लागला. आमचें अंग रगडून काढलें, आम्हांला पेंड, खोबरें चारलें, ओला घास दिला आणि विसांवासुद्धां दिला. आम्हांला उन्ह लागूं नये म्हणून सावलीची खटपट केली, म्हणजे गाड्याच्या बाजूला घोंगड्या लावून सावली करून त्यांत आमची आज बसण्याची, खाण्यापिण्याची सोय केली.

बारावर एक वाजला. दिवस कलायला लागला. मांगांचीं



शर्यतीच्या दिवशीं गाडे एका पुढें एक धाऊं लागले.

डफडीं वाजूं लागलीं. शिंगें वाजूं लागलीं. सनया, सूर आवाज काढूं लागले. गाडे जुंपून तयार झाले.

गाडे चढणीचा रस्ता साफ केलेला होता. परंतु ती काय सडक होती! एवढ्या शेंपांचशें गाड्यांच्या दणदणाटानें धुरळा आणि खडे सारखे निघणारच होते.

सुमारें एक फर्लांगाची चढण चढून मग उतरून जायचे. साराच दमछाकीचा मामला. यावेळीं धनी बैलाच्या जिवाकडे पाहात नाहींत आणि स्वतःच्या जिवाकडे पाहात नाहींत. जो तो आपला गाडा पुढल्या गाड्याला मागें टाकून पुढें कसा जाईल, हेंच बघतों.

अरे ही ओरड कसली झाली? कोणी गाड्याखालीं सांपडला वाटते. हो पण इतकें तरी लक्ष द्यायला वेळ आहे कोणाला?

खंडोबाच्या डोंगराभोंवतीं चौफेर गर्दीच गर्दी उसळली आहे. जत्रेच्या निमित्तानें खेळणीवाले, रेवडीवाले, गुऱ्हाळवाले, गंधवाले सारखा पिंगा घालीत आहेत.

ठरल्याप्रमाणें मीं सरजाला खूण केली. वर्षभर खाल्ल्याचें आज चीज करायचें बघ, आणि सरजानें देखील स्वतःच्या जिवाकडे लक्ष दिलें नाहीं. त्याच्या डाव्या मागल्या पायाला खडा टोंचला व पाय रक्तबंबाळ झाला; पण सरजा माझ्या बरोबरीनें धांवला आणि दादू हिवरेकरांच्या गाड्याचा पहिला नंबर आला.

धन्यानें चपळाईनें आमच्या गळ्यांतील जोखड सोडलें. माझ्या आंगावर सरजानें मान टाकली. मीहि जरा वेळ डोळे मिटून घेतले. जरा वेळानें डोळे उघडल्यावर पाहातों तो सरजाचा पाय रक्तबंबाळ झालेला.

आमच्या धन्याचेंहि आमच्याकडे लक्ष होतेंच; पण त्याच्या भोंवतीं सोयरे धायरे जमून त्यांच्याजवळ जेवण मागत होते. त्या गर्दींतून नाथा निसटला आणि त्यानें सरजाच्या पायावर उपाय


चालविला. इतक्यांत किसन आला आणि तो मला मालीस करूं लागला. आमचे आणखी दोघे जोडीदार बैल होते. त्यांच्याकडे दादूनें लक्ष दिलें.

निंबगांवची शर्यत जिंकल्याची वार्ता रस्त्यानें हिरू मांग डफडें वाजवून सांगत चालला होता.

आम्ही हिवऱ्याला परत येऊन पोहोंचलों तेव्हां बरीच रात्र झाली होती.

आमच्या दाण्यापाण्याकडे, वैरणीकडे धन्यानें अगोदर पाहिलें आणि मग त्यानें खालींवर घोंगडी घेऊन गोठ्यांतच आंग टाकलें. किती मायाळू आहे माझा धनी !





# १२. नाग डोह

आतां मी धन्याचें कोणतेंहि काम करावयास लागलों. धन्याच्या घरांत मीच मोठा जाणता बैल झालों. कधीं कधीं मोट ओढण्याची पाळी मजवर येई. पाठीमागें सरतांना मला फार त्रास होई. पण धन्यानें मला चांगलें चुंगलें खाऊं घातलेलें असल्यानें गडबड न करितां मी मोट ओढी.

एकदां मुलें मुलें व आम्ही नाग डोहावर पोहायला गेलों. नाग डोहाचा ठाव लागत नाहीं. नाग डोहांत पाण्याचा भोंवरा झालेला आहे. भोंवऱ्यांत माणूस अडकलें कीं बहुधा मरतें. दादूला काम होतें. शिवाय बैल पोहणीस नेहमींच मुलें येत. त्याप्रमाणें नाथा व किशा आम्हांला पोहण्याकरितां घेऊन आले.

पोहणें, आंग घासून काढणें, जरा वेळ पाण्यांत गम्मत करणें सर्व कांहीं झालें होतें.

नंतर किसनला काय बुद्धि उत्पन्न झाली कोणाला ठाऊक! त्यानें नाग डोहांत सूर मारला. नाथा वाळूंत आपल्या सोबत्या-बरोबर बोलत होता. किसन दमलेलाच होता. तो गटांगळ्या खाऊं लागला.

नाग डोहांतील भोंवऱ्याबद्दल भीति असल्यानें त्याला तीरावर आणण्यास पाण्यांत उडी टाकण्याचें कोणीच धाडस करीना.

मीसुद्धां पोहून पोहून दमलेलों होतों; पण माझा आवडता किसन बुडतो आहे, हें पाहून मीं ताबडतोब पाण्यांत उडी टाकली

आणि हुसळीसरसा किसनजवळ जाऊन त्याच्याकडे शेपटी केली. शेपटीचा आधार मिळतांच किसननें शेपटीला घट्ट पकडलें आणि मी त्याला ऐलतीराला आणलें.


किसन ऐलतीराला आला मात्र आणि इतक्या वेळच्या दमछाकीमुळें कांहीं वेळ बेशुद्ध पडला !

मुलांच्या भाकरीवर कांदा दिलेला होता; कोणीतरी तो फोडून किसनच्या नाकापुढें धरला. तेव्हां त्यानें जरा वेळानें डोळे उघडले.

घरीं आल्यावर सर्वांनीं माझें कौतुक केलें.

गांवांतील लोकहि म्हणूं लागले, "पांडा फार शहाणा बैल आहे." पण लोक एखाद्याला नांवें ठेवतांना "नुसता बैल आहे झालें," असें म्हणतातच. काय म्हणावें लोकांना.

खरोखर का आम्ही बैल मठ्ठ असतों. आम्ही ज्या वेळीं जागचें हालत नाहीं, तुमचें काम ऐकत नाहीं, त्या वेळीं खरोखरच आमचें



किसननें शेपटीला घट्ट पकडलें आणि मी त्याला ऐलतीराला आणलें.

आंग ठणकत असतें; पण तें कांहीं जणांच्या ध्यानांतहि येत नाहीं व ते नुसते आम्हांला "मठ्ठ" "मठ्ठ" म्हणून हिणवतात आणि एखाद्या मूर्ख माणसाला 'मठ्ठ बैलोबा' म्हणतात.

खरोखर आपल्या मराठी भाषेंत बैल या शब्दाला फार वाईट अर्थ आलेला आहे.

आपल्या संस्कृत भाषेंत आम्हांला वृषभ म्हणतात व वृषभा-सारखे डोळे हे सुंदर व सुदृढ तरुणाचें लक्षण समजतात. भीमाला स्वतःच्या वृषभाक्षाबद्दल अभिमान होता.

देवांचा देव जो महादेव त्याचं वाहन कोण ? आम्हीच.


शंकरानें आम्हांला जवळ केलें. शंकराच्या पूजेला जातांना तुम्ही अगोदर आमची पूजा करतां आणि नांवें ठेवतांना कां बरें एखाद्याला बैल म्हणून हिणवतां ? आम्ही बैल आपसांत बोलतांना "काय, माणूस आहेस झालं !" असें कांहीं एकमेकांस हिणवीत नाहीं.

तसेंच तुमच्यांतील कांहीं माणसें "गरज सरो वैद्य मरो," या म्हणीप्रमाणें आम्ही खराब झालों, तुमचे कष्ट करून करून खराब झालों, मोटा ओढओढून आमचीं हाडें निवालीं, गाडींतील अवजड ओझीं ओढून ओढून आम्ही मरकुडे झालों, आम्ही जरा म्हातारे दिसूं लागलों, कीं सरळ आम्हांला मंचरचा बाजार दाखवितात आणि कसावाच्या स्वाधीन करतात !

खरोखर तुमच्या शेतांत मरण्याची आमची इच्छा असते. तुमच्या शेतांत आमचीं हाडें पुरल्यावर शेतांतील पीक हमखास दुप्पट येईल ही खात्री नाहीं का तुम्हांला ?

आमच्या कातड्याचे पायपोस घाला, पण आम्हांला कसायाच्या हातीं देऊं नका.

☆ ☆ ☆



## १३. भल्या आवशीं


जेवणवेळ होऊन एक झोप झाली कीं, भल्या आवशीं मला किसन चरावयास घेऊन जाई. माझ्याबरोबर गोठ्यांतील आणखी पांच बैल असत.

आम्ही चरायला जंगलांत जात असूं. जंगलांत कांहीं ठिकाणीं मुद्दाम गवत राखून ठेवलेलें असतें. अशा ठिकाणीं फारेष्टाचा बंद भाग म्हणतात. तेथें जनावरें चारण्याची बंदी असते. अर्थात् गवत खूप उंच वाढलेलें असतें. हवें तितकें असतें व दाट असतें. सागाचीं, खैराचीं, ऐनाचीं, पळसाचीं झाडें अधून मधून असतातच. शिवाय करवंदीच्या जाळ्याहि असतात.

बंद भागांत चरावयास जाणारे बैल चाणाक्ष असतात आणि त्यांचे धनीहि मोठे सावध असतात. असेच एका रात्रीं किसननें आम्हांला बंद फारेष्टांत चालविलें. चालतां चालतां बंद फारेष्ट भाग जवळ येतांच मी थबकलों तसे इतर बैलहि थबकले. बैल कां थबकले, याचा किसन विचार करूं लागला. एखादें किरडूं बिरडूं तर नाहींना म्हणून किसननें बॅटरीचा उजेड जमिनीवर टाकला. किरडूं, साप कांहीं आढळलें नाहीं. तेव्हां त्यानें बॅटरी जमिनीच्या दिशे-कडून जरा वर उचलून समोर धरली; तर त्याला काय दिसलें !

एका करवंदीच्या जाळीपुढून वाघोबाची स्वारी आडवी चालली होती. वाघाची नजर बॅटरीच्या झोताकडे नव्हती म्हणून बरें ! वाघ तरी असा तसा होता कां तो ! अस्सल पटई होती पटई !

त्या दिवशीं कसला चारा आणि कसला विसावा. आम्ही



आम्ही शेपट्या वर करून जे निघालों, ते तडक घरीं !

शेपट्या वर करून जे निघालों ते जीव घेऊन तडक दादूच्या गोठ्यांत शिरलों. किसनहि मोठा धीराचा गडी आहे. तोहि आमच्यामागें धांवत धांवत आला. त्या दिवसानंतर बरेच दिवस आम्ही बंद भागाकडे फिरकलों नाहीं.

एके दिवशीं नाथानें बातमी आणली कीं, शिकाऱ्यानें एक भला सपाट्या वाघ मारला. त्यानंतर मग आम्ही पुन्हा बंद भागाकडे चरावयास जाऊं लागलों.

☆ ☆ ☆



अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि. ९३।३।५४

# १४. चोरी अंगाशीं आली

किसन माझ्यावर प्रेम करीत होता. नाथाची माझ्यावर माया होती. दादू माझे लाड करीत होता.

मला खाण्यापिण्याला कांहीं कमी नव्हतें. कष्टहि जिवापाड करावे लागत नव्हते; तरीहि एक दिवस मला अवदसा आठवली. मी रात्रीचा दावें तोडून नुकत्याच पोटरीवर आलेल्या शाळूंत शिरलों. तो कोंवळा लुसलुशीत शाळू मीं यथेच्छ खाल्ला आणि पाणी प्यालों.

किसनला जाग आली. मी जाग्यावर नाहीं असें पाहतांच तो मला शोधूं लागला. आमची स्वारी मजेंत पसरली होती; पण थोड्याच वेळांत माझें पोट फुगूं लागलें व मला प्राणान्तिक वेदना होऊं लागल्या. पोटरीवर आलेला शाळू मनमुराद खाल्ल्यानें माझ्या काळजास भिडला व आतां माझे प्राण जातात असें होऊन गेलें.

तावडतोब धन्याच्या घरचीं सारीं माणसें जागीं झालीं आणि माझ्याभोंवतीं गोळा झालीं. मी डोळ्यांतून पाणी गाळीत होतों. माझ्या तोंडाला फेस आला होता. आणि घटका दोन घटकेचा सोबती राहिलों होतों. पण माझें नशीब फार बलवत्तर. त्याच रात्रीला चावडीमध्यें गुरांच्या डॉक्टरांचा मुक्काम होता. गांवांतील बैल खच्ची करण्यासाठीं आले होते व उद्यां तो मला मुळींच न आवडणारा कार्यक्रम होणार होता.

दादूला डॉक्टर आल्याचें समजलें. तावडतोब डॉक्टर साहेबांकडे वर्दी गेली. डॉक्टरसाहेबहि तावडतोब आमच्या मळ्यांत सगळीं औषधें घेऊन आले. त्यानंतर काय झालें, डॉक्टरांनीं



डॉक्टरसाहेब तावडतोब आमच्या मळ्यांत आले.

कोणते उपाय केले, हें मला मुळींच आठवत नाहीं, कारण मी बेशुद्ध होतों. सकाळीं मी शुद्धीवर आलों. तेव्हां अगदीं गळून गेलों होतों.

पुन्हा दावें तोडून चादुक खायचें नाहीं अशी मी शपथ वाहिली. आम्हां बैलांना बैल, मठ्ठ म्हणून माणसें कां हिणवितात याचें मर्म मला त्या दिवशीं समजलें. पण तुम्ही माणसें सुद्धां नाहीं का माझ्याप्रमाणें जिवावर बेतणाऱ्या चुका करीत?

मला वाटतें, तुम्ही माणसें सुद्धां फार मोठाल्या, ज्या योगानें प्रसंगीं तुमचा जीव जाईल अशा चुका करतां — तशा आपणा कोणाच्याचकडून घडूं नयेत म्हणून देवानें आपल्याला चांगली बुद्धि द्यावी हीच इच्छा.

आपला,

**पांडा**